दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १८० • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२५ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## येत्या ७ ऑक्टोबरपासून राज्यातील सर्व मंदिरे उघडणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक महिन्यांपासून मंदिरे उघडण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या जनतेसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेत दिलासा दिला आहे. घटस्थापनेच्या मुहूर्तावर येत्या ७ ऑक्टोबरपासून राज्यातील मंदिरे उघडण्याा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दोन आठवड्यांपूर्वी राज्यात टप्प्याटप्प्याने मंदिरे उघडण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे म्हटले होते. त्यानंतर राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सर्वधर्मीयांची प्रार्थनास्थळे उघडली जाणार आहेत.

यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणतात की, दुसऱ्या लाटेचा मुकाबला केल्यानंतर आता संभाव्य तिसऱ्या लाटेशी लढण्याचे आपण नियोजन केले आहे केले आहे.

मात्र हळूहळू सर्व प्रकारची काळजी घेत बऱ्याच बाबतीत निर्बंध शिथिल करीत आलो आहोत. सध्या कोरोनाच्या रुग्ण संख्येमध्ये उतार येत असला तरी आपल्याला अधिक सावध राहावे लागेल.

# पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयाला महासभेची मान्यता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'क' मधील भूखंड क्र ०४ सेक्टर १६ नवीन पनवेल या भूखंडावर पनवेल महानगरपालिका मुख्यालय बांधणे हा विषय महासभेने एकमताने मंजूर केला.

आज(२४सप्टेंबर) महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. यावेळी उपमहापौर जगदीश गायकवाड, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, नगरसचिव तिलकराज खापर्डे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### लवकरच काम सुरू होणार

**पहिला मजला :** संगणक कक्ष, बँक एटीएमची सुविधा देण्यात आली आहे.

**दुसरा मजला :** बहुद्येशीय हॉल, अग्निशमन विभाग, पर्यावरण विभाग, वृक्ष प्राधिकरण विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, कर विभाग, लेखा विभाग, परिक्षक विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग असणार आहे.

**तिसरा मजला :** पाणी पुरवठा, विद्युत विभाग, मलनिस्सारण विभाग, वैद्यकिय आरोग्य विभाग, ग्रंथपाल, सुरक्षा विभाग, माहिती व तंत्रज्ञान, मालमत्ता विभाग, क्रिडा विभाग, विधी विभाग असणार आहे.

**चौथा मजला :** नगर रचना विभाग, शहर अभियंता विभाग, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) विभाग, अभिलेख कक्ष, भविष्यातील विस्तार करीता मोकळी जागा असणार आहे.

**पाचवा मजला :** महापौर दालन, उपमहापौर दालन, स्थायी समिती दालन, सभागृह नेते दालन, विरोधी पक्ष नेता दालन,कॉन्फरन्स हॉल, समिती बैठक कक्ष, तसेच आयुक्त दालन, अतिरिक्त आयुक्त दालन असणार आहे.

**सहावा मजला :** महासभा सभागृह सचिव कार्यालय, महिला नगरसेविका कक्ष, महिला –बालकल्याण समिती दालन, गटनेते दालन असणार आहे. सहाव्या वरच्या मजल्यावरती प्रेस व्हिवींग गॅलरी, व्हिआयपी गॅलरी, ऑडीओ विज्युल रूम, गटनेते दालन,असणार आहे. टेरेसवरती कला दालन असणार आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने व नागरिकांच्या सोयी –सुविधा पुरविण्याकरिता अद्यावत,प्रशस्त कार्यालयाची आश्यकता असल्याने महापालिकेच्या मुख्यालयाचा ठराव आज महासभेत मांडण्यात आला. हा विषय सर्व नगरसेवकांनी एकमताने मंजूर करून मा. आयुक्तांचे अभिनंदन केले.

प्रस्तावित मुख्यालयाची इमारत ही सहा मजली असून तळघर वाहनचालक, फॅन रूम, सर्व्हिस रूम, एसटीपी रूम, व पार्किंग असणार आहे. तळमजला नागरी सुविधा केंद्र, भांडार विभाग, पत्रकार कक्ष, उपहारगृह, दिव्यांग कक्ष,



वाचनालय असणार आहे.

यावेळी मुख्यालयाच्या इमारतीचे प्रेझेंटेशन सर्वांना दाखविण्यात आले. मुख्यालयाची माहिती आयुक्त श्री.देशमुख यांनी नगरसेवकांना दिली. यावरती नगरसेवकांच्या सूचना विचारून त्यांची नोंद घेण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर कळंबोली, नवीन पनवेल येथील उद्याने , खेळांची मैदाने विकसित करण्याच्या विषयाला महासभेने मान्यता दिली. महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंड क्र.२४७ मधील कॉम्प्लेक्स इमारतीवर दूसऱ्या मजल्याचे महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाज करण्यासाठी बांधकाम करणे आणि अस्तित्वात तळमजला, पहिला मजला इमारतीची दुरूस्ती करणे या विषयास स्थगिती देण्यात आली.

## संक्षिप्त...

### महिला पोलिसांचे कामाचे तास १२ वरून ८ तास होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने महिला पोलिसांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील महिला पोलिसांच्या कामाचे तास १२ वरून ८ करण्यात येणार आहे. राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी शुक्रवारी ही माहिती दिली. 'एएनआय' या वृत्तसंस्थेने याबाबत वृत्त दिले आहे.


सध्या पोलीस दलात कर्तव्य बजावणाऱ्या महिलांना १२ तास काम करावे लागत आहे. महिला पोलिसांना कामाबरोबरच कुटुंबाची जबाबदारी देखील पार पाडत तारेवरची कसरत करावी लागते. अनेक वेळा सणासुदीच्या दिवशी, बंदोबस्त, गंभीर गुन्हे यानिमित्ताने वर्षभरातून अनेक वेळा १२ तासापेक्षा जास्त कर्तव्य पोलिसांना बजवावे लागते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या जबाबदारीवर आणि कर्तव्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारने महिला पोलिसांच्या कामाचे तास बारा तासांहून आठ तास करण्याचा निर्णय घेतला आहे. हा अतिशय चांगला निर्णय असून पोलीस दलासाठी एक खुशखबर आहे. यामुळे अनेक महिला पोलीस कर्मचाऱ्यांना कुटुंब आणि नोकरी यामध्ये चांगला असा ताळमेळ घालणं शक्य होणार आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील यांच्यासह संपूर्ण मंत्रीमंडळाचे मनापासून आभार', असे ट्वीट खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे.

## पनवेलमध्ये साखरचौथ गणपतींचे आगमन

### २० सार्वजनिक, ७६ घरगुती 'श्रीं' ची प्रतिष्ठापना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनंत चतुर्दशीनंतर चार पाच दिवसांनी येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला म्हणजेच साखर चतु–र्थीला गणेशमूर्तींची स्थापना केली जाते. तर दुसऱ्या दिवशी गणेशमूर्तींचे विसर्जनही केले जाते. रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने पनवेल, पेण, उरण आणि अलिबाग या तालुक्यांत साखरचौथ गणेशोत्सव साजरा करण्याची पूर्वापार प्रथा आहे. यावर्षी पनवेलमध्ये २० सार्वजनिक तर ७६ घरगुती अशा साधारण एकूण ९६ साखरचौथीच्या गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



साखरचौथीच्या गणपतीची प्रथा वर्षानुवर्षे, परंपरांगत चालत आलेली आहे. भाद्रपद चतुर्थीला आगमन झालेल्या बाप्पांनी दहा दिवसांचा पाहुणचार घेवून अनंत चतुर्दशीला विसर्जन करण्यात आले. त्यानंतर आलेली संकष्ट चतुर्थी अर्थात साखरचौथीला पुन्हा भक्तांच्या आग्रहाखातर बाप्पा दीड दिवसाच्या अल्प कालखंडासाठी इच्छादर्शन व मनोकामना पूर्ण करण्यासाठी आमंत्रण स्वीकारुन विराजमान झाले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्यावर्षी सण उत्सव साजरे करण्यासाठी निर्बंध असल्याने गणेशोत्सव साजरा करता आला नाही. मात्र यावर्षी शासनाने गणेशोत्सव साजरा करण्यासाठी शिथिलता दिल्याने गणेशभक्तांनी उत्साहात व सर्व नियम पाळून गणेशोत्सव साजरा केला. त्याप्रमाणेच दरवर्षीप्रमाणे यंदाही साखरचौथीच्या गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली असून पनवेलमध्ये गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण दिसून येत आहे. परंतु अद्यापही कोरोनाचे संकट टळलेले नसल्याने प्रशासनाकडून गणेशोत्सव साजरा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना आणि नियमावली जाहीर करण्यात आली आहे.

या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे बाप्पाच्या मोहक मूर्ती व ठिकठिकाणी केलेली आरास पाहण्यासाठी गणेशभक्तांमध्ये उत्सुकता पाहायला मिळाली. काही ठिकाणी गुरुवारी (दि.२३) रात्रीच गणरायांचे आगमन झाले तर काही ठिकाणी आज (शुक्रवार दि.२४) गणरायांचे आगमन झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकांना बंदी असल्याने यंदाही गुलालाची उधळण, ढोल ताशा, डीजे, बेंजो विना शांततेत गणरायांचे आगमन झाले. कोरोनामुळे अद्यापही निर्बंध जारी केलेले असल्याने यंदा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये अनुत्सुकता पाहायला मिळाली. त्यामुळे यावर्षी साधारण ५ सार्वजनिक मंडळांनी साखरचौथ गणेशोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला. साखरचौथ गणपती निमित्ताने पनवेलमध्ये गणरायांच्या सुबक मूर्तींसह निरनिराळी मनमोहक आरास पाहायला मिळते.

## बसच्या टायरला लागलेल्या आगीत प्रवासी बचावले

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : एका लक्झरी बसच्या टायरला अचानकपणे आग लागली. परंतु त्या ठिकाणी असलेल्या नागरिकांनी तातडीने अग्नीशमन दलाचे बंब घटनास्थळी पाचारण केल्याने पुढील अनर्थ टळला अहे.



खारघर टोल नाका येथे गोवा वरून आज सकाळी मुंबईच्या दिशेने जाणार्या लक्झरी बसच्या टायरला अचानकपणे भीषण आग लागल्याने गाडीतील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. परंतु खारघर टोल नाकाच्या कर्मचार्यांनी कळंबोलीच्या अग्निशमन दलाला याबाबत कळविले व अग्नीशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहचून त्यांनी सदरची आग आटोक्यात आणली आहे.

## दीपावली सणानिमित्त पालिका अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना सानुग्रह अनुदान मिळावे : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२०२१ च्या दीपावली सणानिमित्त पालिका अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना सानुग्रह अनुदान मिळावे आणि सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करावा अशी मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी पालिकेचे आयुक्त यांच्याकडे केली आहे.



लोक दिवाळी दरवर्षी साजरी करतात, भारताच्या सर्व सणांतील हा सण लोकांना आनंदाने,उत्साहाने भरपूर करतो. दीपावलीचे चार दिवस हा आनंद दुथडी भरून वाहतो.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालिकेत काम करणारे सर्व कर्मचारी वर्गास दीपावली सण गोड व्हावा याकरता सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय पुढील सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करून घेण्यात यावा अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे, प्रीती जॉर्ज, नगरसेविका डॉ डॉक्टर सुरेखा मोहोकर, सारिका भगत यांनी केली आहे.

## ४ ऑक्टोबरपासून राज्यातील शाळा सुरू होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील शाळा सुरू करण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी परवानगी दिली आहे. ऑक्टोबर महिन्यात ४ तारखेप–ासून शाळा प्रत्यक्ष सुरू केल्या जाणार आहेत. राज्यातील कोविड संक्रमण स्थिती काहीशी निवळल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र नेमके कोणते वर्ग सुरू होणार हे याबाबत अद्याप काहीही स्पष्ट करण्यात आलेले नाही. मात्र ४ ऑक्टोबर २०२१ पासून शाळा सुरू होणार असून या वृत्ताला शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनीही एका वृत्तवाहिनीशी बोलताना दुजोरा दिला आहे. सर्व कोविड नियमांचे पालन करून शाळा सुरू करण्याची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

राज्यातील शाळा कधी सुरू केल्या जाणार, या चर्चेला यामुळे पूर्णविराम मिळाला आहे. गेले अनेक दिवस शिक्षक आणि समाजातील तज्ज्ञ व्यक्तींकडून शाळा प्रत्यक्ष सुरू करण्याची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही वक्तव्य केले होते की २ ऑक्टोबर २०२१ नंतर कोविड संक्रमण स्थितीचा आढावा घेऊन शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

दुसरीकडे, अद्याप राज्यातील महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू झालेली नसताना शाळा मात्र आधी सुरू होत असल्याबाबत काही पालक संघटनांनी चिंताही व्यक्त केली आहे. दरम्यान, शाळा प्रत्यक्ष सुरू होणार असल्या तरी त्या सुरुवातीला ऐच्छिक स्वरुपात असतील, असेही कडू यांनी सांगितले. कोविड नियमांचे पालन कसे करायचे, शिक्षकांचे लसीकरण आदींसंदर्भात येत्या दोन दिवसांत सविस्तर भूमिका जाहीर केली जाईल, असेही ते म्हणाले.

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते

## विविध विकासकामांचे भूमीपूजन व उद्घाटन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते आज शुक्रवार, दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी तळा तालुक्यातील कळसांबळे येथे कळसांबळे बौध्दवाडी सामाजिक सभागृहाचे भूमीपूजन, कळसांबळे वाडीतील व्यायामशाळा साहित्य लोकार्पण आणि कळसांबळे



गावातील स्मशानभूमी भूमीपूजन संपन्न झाले.

तद्नंतर आडनाळे गौळवाडी येथील गौळवाडी आडनाळे रस्त्याचे तसेच गौळवाडी स्मशानभूमीचे भूमीपूजन तर गौळवाडी अतंर्गत

.../२

## संकष्टी चतुर्थी निमित्त अनेक भक्तांनी घेतले चिरनेर महागणपतीचे मुखदर्शन

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर हे एक इतिहास प्रसिद्ध गाव आहे. अठरापगड जातीच्या या गावाला २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या जंगल सत्याग्रहाचा जाज्वल्य इतिहास आहे. तसाच प्राचीन महागणपती देवस्थानाचा भक्तिमय वारसा आहे. अशा महागणपती देवस्थान चरणी नतमस्तक होण्यासाठी काल शुक्रवारी आलेल्या संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधून नवीमुंबई पनवेल उरण येथील अनेक भक्तांनी मंदिर बंद असतांनाही मुख दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.



निसर्गरम्य डोंगरकुशीत वसलेल्या या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे. गावात असणारे महागणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. शिलाहार राजवटीत निर्मिलेले महागणपती मंदिर ततत्कालीन मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केले मात्र तत्पूर्वी गणेशभक्तांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळील तलावात सुरक्षित लपवून ठेवली होती. तद्नंतर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना देवाने स्वप्नात येऊन मला तलावातून बाहेर काढ असे सांगितले.

त्याप्रमाणे त्यांनी तलावाचे खोदकाम करून मूर्ती बाहेर काढली. आणि नविन पाषाणी भव्य मंदिरात

.../२

# स्वत्वपरीक्षा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अखेर बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने घेण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर, ही पद्धत रद्द करून या पुढे एक सदस्यीय पद्धतीनेच निवडणुका घेण्याची घोषणा करण्यात आली होती. सहकारी राजकीय पक्षांचा दबाव व विरोधात असलेल्या भारतीय जनता पक्षाची या संस्थांमधील सत्ता घालविण्याचा उपाय म्हणून, अखेर उद्धव ठाकरे यांच्या सरकारला हा निर्णय घ्यावा लागला आहे. यातही चार सदस्यांचा प्रभाग असावा म्हणून काही वजनदार मंत्री आग्रही होते, तर राष्ट्रवादी काँग्रेसचा आग्रह दोन सदस्यांचा प्रभाग असावा, असा होता. शेवटी तीन सदस्यांचा प्रभाग, असा तोडगा काढण्यात आला. मुळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज आहे. महिलांना या संस्थांमध्ये प्रारंभी तेहतीस टक्के व आता पन्नास टक्के आरक्षण दिल्यानंतर, प्रस्थापितांची सोय करण्यासाठी ही शक्कल शोधण्यात आली. आपला प्रभाग आरक्षित झाला, तर किमान शेजारच्या दोन किंवा तीन प्रभागांतून उभे राहण्याची सोय त्यामुळे झाली. सुमारे वीस वर्षांपूर्वी हा बदल पहिल्यांदा करण्यात आला, त्यावेळेस राजकारणाचे गुन्हेगारीकरण टाळण्यासाठी ही पद्धत आणण्यात येत असल्याचे सांगितले जात होते. एकसदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये स्थानिक गुंड दहशतीच्या किंवा पैशांच्या जोरावर निवडून येतो. मतदारसंख्या वाढल्यास त्या सर्वांवर प्रभाव पाडणे त्याला शक्य होणार नाही, असे समर्थन तेव्हा केले गेले. गेल्या वीस वर्षांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींची निवडणूक प्रतिज्ञापत्रे बघितली, तरी या दाव्यातील फोलपणा दिसेल. यातील अनेक लोकप्रतिनिधींवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असतात आणि प्रत्येक निवडणुकीमध्ये त्यांची संख्या वाढतेच आहे. महिलांसाठी आरक्षण आल्यानंतर, संबंधित नेत्याच्या पत्नीला किंवा मुलीला संधी देण्याचा प्रयोग सर्व राजकीय पक्षांनी करून बघितला; पण सत्तेपासून फार काळ दूर राहणे शक्य नसल्याच्या पुरुषी अहंकारातून अखेर हा तोडगा शोधला गेला. अर्थात, या आरक्षणामुळे किमान या पातळीवर तरी महिलांना निर्णयप्रक्रियेमध्ये स्थान मिळाले. हे सगळे सुरू असताना, मुंबई महानगरपालिकेमध्ये मात्र कधीही बहुसदस्यीय प्रभाग केले गेले नाहीत. प्रत्येक वेळेस मुंबई महानगरपालिकेचा अपवाद केला गेला. राज्यातील राज्यकर्ते बदलले, तरी मुंबईबाबत त्यांची भूमिका सातत्याने एकच कशी राहिली, याचाही विचार करायला हवा. गेल्या वीस वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभागरचना ही नेहमी राज्यातील सत्ताधीशांच्या मर्जीनुसार केली गेली. वीस वर्षांपूर्वी प्रत्येक प्रभाग तीन सदस्यांचा, कधी दोन सदस्यांचा, तर कधी एका सदस्याचा असे करीत, गेल्या निवडणुकीमध्ये थेट चार सदस्यांचा एक प्रभाग केला. कोणी कितीही नाकारले, तरी चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोकप्रियता शिगेला असताना, या पद्धतीतून राज्यातील सत्तर टक्के महापालिकांवर भाजपने सत्ता काबीज केली. इतकेच नव्हे, तर स्वातंत्र्यानंतर प्रथमच अनेक जिल्हा परिषदाही भाजपला जिंकता आल्या; त्यामुळे एक किंवा दोन सदस्यीय प्रभाग पद्धत काँग्रेस व 'राष्ट्रवादी'ला अनुकूल ठरते, तर त्यापेक्षा अधिक सदस्यांचा प्रभाग भाजपला अनुकूल ठरतो, असे ढोबळ गणित मांडले जाते. आता महाविकास आघाडीचे सरकार असताना व 'राष्ट्रवादी' दोन सदस्यांच्या प्रभागांसाठी आग्रही असतानाही, तीन सदस्यांच्या प्रभागाचा निर्णय का घेतला गेला, हा औत्सुक्याचा विषय आहे. मुख्यमंत्री ठाकरे यांनी याबाबत ठाम भूमिका घेताना, उरलेल्या दोन पक्षाच्या नेत्यांवर मात केल्याचीही चर्चा आहे. यातून राज्याच्या राजकारणातील अस्थिरता अजूनही कायम असल्याचा निष्कर्ष निघतो. आत्तापर्यंतचा इतिहास पाहिला, तर मुंबई खालोखाल ठाणे व औरंगाबाद या महापालिकांमध्ये शिवसेनेने भाजपशी युती करून सत्ता मिळविली होती; पण त्या पक्षाला खरा रस मुंबई महापालिकेमध्ये वर्चस्व टिकविण्यात असल्याचे पूर्वीच सिद्ध झाले आहे. भाजपबरोबर काही छुपा समझोता करून मुंबई पालिकेतील वर्चस्व कायम ठेवण्याचा शिवसेनेचा हा प्रयत्न आहे का, या प्रश्नाचे उत्तर येणारा काळ देईलच. या प्रभाग रचनेच्या निर्णयामुळे आता स्थानिक निवडणुकांचे बिगूल वाजले आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाचा तिढा सोडवून या निवडणुका घेण्यासाठी सरकारवर दबाव असणारच आहे. राज्यात सत्ता स्थापन केल्यानंतर घेतलेल्या विविध निर्णयांकडे राज्यातील जनता कशी बघते, याचा कौलही या निवडणुकीतून स्पष्ट होणार आहे. एका अर्थाने, ही महाविकास आघाडी सरकारची सत्त्वपरीक्षाच आहे.

# कळंबोलीत केएलईच्या विद्यार्थ्यांची गांधीगिरी; रोडपाली तलाव परिसर केला एकदम स्वच्छ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत त्याचबरोबर विविध उपक्रमांमध्ये श्रमदानाच्या माध्यमातून श्रमसंस्कार केले जातात. या माध्यमातून श्रमाचे महत्त्व एक प्रकारे पटवून दिले जाते. दरम्यान याच उद्देशाने कळंबोलीतील केएलई कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रोडपाली तलावा लगत स्वच्छता अभियान घेतले. महानगरपालिकेच्या सहकार्याने त्यांनी परिसर स्वच्छ केला. आजादी का अमृत महोत्सव या अंतर्गत ही मोहीम राबवून विद्यार्थ्यांनी एक प्रकारे गांधीगिरी केली.

रोडपाली येथील म्हसोबा तलाव हा फार जुना आहे. याठिकाणी पूर्वी जनावरे पाणी पिण्यासाठी येत असत. कालांतराने येथे नागरीकरण वाढले जमीन हद्दपार झाल्यानंतर गाई म्हशीं बरोबरच इतर पाळीव जनावरं सुद्धा इतिहास जमा झाले. एकंदरीतच हा तलाव काही प्रमाणात दुर्लक्षित झाला. याच ठिकाणी गणेश विसर्जन गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे. दरम्यान आजूबाजूला वाढलेली लोकवस्ती आणि येथील रहिवाशांना काहीसा विरंगुळा मिळावा त्याचबरोबर सकाळी मॉर्निंग वॉक करण्याच्या अनुषंगाने सोय व्हावी या अनुषंगाने सिडकोकडून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याचबरोबर तलावांमधील गाळ सुद्धा काढण्यात आला. विसर्जना करता स्वतंत्र व्यवस्था येथे करण्यात आली. असे असतानाही येथे येणारे नागरिक तलाव परिसरातच कचरा टाकून देतात. त्याचबरोबर नुकतेच गणेश विसर्जन झाले आहे.त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता. या पार्श्वभूमीवर केएलई कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या बरोबर म्हसोबा तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबवले. या ठिकाणचा कचरा उचलून परिसर स्वच्छ करण्यात आला. तलावांमध्ये साचलेल्या कचरा सुद्धा बाहेर काढण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्रमसंस्काराचे एकप्रकारे धडे घेतले.

यावेळी महादेव विद्यालयाच्या प्राध्यापिका सविता शिरगनवार, पल्लवी सोलसे, सचिन मोरे, कविता दंगेटी, हिमानी अग्रवाल, सुलोचना भालेकर, संध्या खरे तसेच प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे,स्वच्छता पर्यवेक्षक हरेश कंबळे, स्वचता निरीक्षक अखिल रोकडे, हर्षद पाटील, प्रेमनाथ गायकवाड व २७ विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.



# नांदगावच्या शिवशाही प्रतिष्ठानचा साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना साधेपणाने : हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक



**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानले जाणा-या ,भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या भाविकांचे श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या मुरुड तालुक्यातील नांदगावच्या शिवशाही प्रतिष्ठान आयोजित साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळातर्फे बाजारपेठेतील साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना साधेपणाने करण्यात आली. यंदाच्या पुजेचा मान दिनेश शाहपूरकर यांना मिळाला.

नांदगाव मधील शिवशाही प्रतिष्ठान साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळाच्या वतीने सन.२०१३ पासून साखर चौथ गणपती बसविला जात असून यंदाचे नववे वर्ष आहे. या सोहळ्यामध्ये प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून महेश मापगांवकर,सुदेश घुमकर,शैलेंद्र दिवेकर,विलास सुर्वे, उदय थळे, नरेश कुबल,सुमित कांबळे यांना साखरचौथ गणपती पुजेचा मान मिळाला आहे. शुक्रवार दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ८.०० वा.श्री मुर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना, आरती करण्यात आली. यानिमित्ताने सायंकाळी ७.०० वा.संगीत भजनाचा सुश्राव्य बहारदार कार्यक्रम व रात्रौ १२.०० वा.महाआरती घेण्यात आली. यावेळी भक्त गण उपस्थित होते. शनिवार दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी विधिवत पूजा अर्चा आरती व सायंकाळी ५.०० वा.श्री मुर्ती ची गावातून साधेपणाने मिरवणूक काढण्यात येणार असून विसर्जन सोहळा होणार आहे. शिवशाही प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुदेश घुमकर असून मंडळ कार्यकारी अध्यक्ष योगेश जयस्वाल, उपाध्यक्ष सुदेश भणगे,सचीव महेश कोतवाल हे आहेत.

# कलादालनातून मराठी रंगभूमीच्या वैभवशाली परंपरेचे दर्शन व्हावे : मुख्यमंत्री



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राला रंगभूमीचा समृध्द इतिहास असून हा इतिहास आणि वारसा आजच्या पिढीपर्यंत पोह-ोचणे आवश्यक आहे. गिरगाव चौपाटी येथील बिर्ला क्रीडा केंद्र येथे उभारण्यात येणाऱ्या मराठी रंगभूमी कलादालनातून मराठी रंगभूमीच्या वैभवशाली परंपरेचे दर्शन होईल या पध्दतीने या कलादालनाचे काम व्हावे, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या.

मराठी रंगभूमी कलादालनाच्या उभारणीसंदर्भातील बैठक मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. वर्षा येथील समिती कक्षात झालेल्या या बैठकीस उद्योगमंत्री सुभाष देसाई, सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्षआदेश बांदेकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिह, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, अभिनेते सर्वश्री राजन भिसे, विजय केंकरे, ऋषिकेश जोशी, नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे, अभिनेत्री सई गोखले, ऑनलाईन पद्धतीने अभिनेते सुबोध भावे यांच्यासह बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, या रंगभूमी संग्रहालयाच्या माध्यमातून मराठी रंगभूमीचा गौरवशाली इतिहास, रंगभूमीची वैशिष्ट्ये आणि वैभवशाली वाटचाल दृष्टिपथात येणे आवश्यक आहे. मराठी रंगभूमीची वाटचाल समाज घडवणारी आहे. ही रंगभूमी समाजाबरोबर चालणारी आहे. त्यामुळे मराठी रंगमंच कलादालनातून प्रेक्षकांना मराठी रंगभूमीची वाटचाल अनुभवता येण आवश्यक आहे. रंगभूमी कलादालन स्वयंपूर्ण आणि सक्षम होण्याबरोबरच नवीन पिढीलाही बांधून ठेवेल असे असणे आवश्यक आहे.

मराठी रंगमंच कलादालन येथे येणाऱ्या प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र तर व्हावेच, पण त्याचबरोबर रंगभूमीची वाटचाल उलगडवून दाखवणारे उत्तम असे संग्रहालय साकारण्यात यावे.कलादालनामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास दृक्-श्राव्य संग्रहालय, त्रिमिती सादरीकरणाची व्यवस्था याबरोबरच रंगभूमीच्या वाटचालीशी निगडीत शासनाच्या विविध विभागांकडे उपलब्ध संदर्भ, दस्तऐवज आदी गोष्टींबाबत समन्वय साधण्याचे आणि या कामाला वेग देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी यावेळी दिले. कलादालनाच्या निर्मितीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्व उपनगराचे अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली संहिता विकास समितीची (कंटेंट डेव्हलपमेंट कमिटी) स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय लवकरच हेरिटेज कमिटी (पुरातत्व समिती) ची स्थापनाही करण्यात यावी. मराठी रंगमंच कलादालनात नाटकाचा उगम ते आतापर्यंतचा प्रवास उलगडला जावा, संगीत, व्यावसायिक, प्रायोगिक रंगभूमी, दलित, कामगार नाट्य चळवळ आणि त्याची वैशिष्ट्ये माहित व्हावीत, ज्येष्ठ मराठी नाटककार, नेपथ्यकार, लेखक, नाट्य कलावंत यांचीही माहिती येथे उत्तम मांडणीतून उपलब्ध व्हावी असेही श्री.ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

# पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर जयंती समारंभ उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा कर्मवीर जयंती समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३४व्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाईन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

समारंभाच्या सुरूवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी कर्मवीर जयंतीचे औचित्य समजावून सांगितले. यासोबतच त्यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचाही आढावा घेतला. समारंभासाठी उपस्थित असलेल्या दोन्ही मान्यवरांची त्यांनी उपस्थितांना ओळख करून दिली व त्यांचे स्वागत केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी आपल्या मनोगतात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडून दाखविला. ज्ञानाची शिदोरी समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहा-ेचली, तर ती कर्मवीरांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरेल, असे सूतोवाचही त्यांनी याप्रसंगी केले.

समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करताना मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी दातृत्व आणि कर्तृत्व यांची सांगड घालून प्रत्येक रयत सेवकाने कार्यप्रवण व्हायला हवे, असा मौलिक सल्ला दिला.

या समारंभाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ. नरेश मढवी, प्रा. अनिल रोकडे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, तंत्रसहायक डॉ. गिरीश गुंड यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक, तसेच सर्व विद्याशाखांमधील विद्यार्थांनी या समारंभाला भरभरून प्रतिसाद दिला. समारंभाचे आभारप्रदर्शन प्रा. प्रवीण गायकर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांनी केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विविध विकासकामांचे भूमीपूजन व उद्घाटन संपन्न

रस्त्याचे उद्धाटन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## संकष्टी चतुर्थी निमित्त अनेक भक्तांनी घेतले चिरनेर महागणपतीचे मुखदर्शन

मूर्तीची प्रतिष्ठापना केली. महागणपतीचे मंदिर पाषाणी, गोल घुमटाचे असून पूर्वाभिमुख आहे. मंदिरात स्थानापन्न असलेली महागणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मासनात बसलेली आहे.मूर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे.

नवसाला पावणारा गणपती म्हणून महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाच्या दर्शनाला नेहमीच भाविकांची गर्दी असते, मंगळवारी दि.२४ रोजी संकष्टी चतुर्थी असल्याने उरण, पनवेल, नवीमुंबई मधिल भाविक मंदिरात दर्शनार्थ आले होते, पण मंदिर बंद असल्याने त्यांना गणरायाचे मुख दर्शन घेऊनच समाधान मानावे लागत होते. मंदिर बंद केली असली तरी भाविकांच्या श्रद्धेला कोणी बंदिस्त करू शकत नाही हे यावरून भाविकांच्या प्रतिक्रिया उमटत होत्या.तरी राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी लवकरच मंदिरे उघडावीत अशी प्रतिक्रिया अनेक गणेश भक्तांनी व्यक्त केली आहे.

# झोपडीच्या वादातून तिघांवर प्राणघातक हल्ला करणारे पाच हल्लेखोर अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एपीएमसीतील ग्रीन पार्क झोपडपट्टीत बेकायदेशीरीत्या उभारण्यात आलेली झोपडी विकणार्या इब्रान सलीम खान याने व त्याच्या पाच साथिदारांनी त्या भागातील झोपडी खरेदी केलेल्या तरुणावर व त्याच्या दोघां साथिदारांवर चाकुने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गत शनिवारी सायंकाळी घडली. या हल्ल्यात एक तरुण गंभीररीत्या जखमी झाला असून त्याला सायन येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर एपीएमसी पोलिसांनी सहा हल्लेखोरांविरोधात प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यापैकी ५ आरोपींना अटक केली आहे.

या घटनेतील तक्रारदार आतिकुर अनिसुर शेख ( २५ ) हा मानखुर्द येथे रहाण्यास असून तो चालक म्हणून काम करतो . तुर्भे सेक्टर -१९ मधील ग्रीन पार्क येथे रहाणारा इब्रान सलीम खान ( ३२ ) हा ग्रीन पार्क येथे असलेली जागा विकत असल्याची माहिती अतिकुर शेख याला मिळाली होती. त्यामुळे त्याने जानेव-ारी -२०२० मध्ये इब्रान याची भेट घेतली होती . त्यावेळी ८० हजार रुपयांमध्ये ग्रीन पार्कमधील जागा खरेदी विक्रीचा त्यांच्यात व्यवहार ठरल्यानंतर आतिकुर याने इब्रानला ८० हजार रुपये दिले होते. त्यावेळी इब्रान याने त्याला दोन पावत्या दिल्यानंतर आतिकुर याने सदर जागेवर झोपडे बनवून त्याला टाळे लावले होते. मानखुर्द येथील घराचे ॲग्रीमेंट संपल्यानंतर तो पत्नीसह सदर झोपडीत रहाण्यास येणार होता. पंधरा दिवसापुर्वी इब्रान याने आतिकुर याला फोन करुन त्याचे ग्रीन पार्क येथील झोपडे त्याच्या बहिणीला रहाण्यासाठी देण्याची मागणी केली होती. मात्र आतिकुर याने त्याला आपले झोपडे देण्यास नकार दिल्याने इब्रान याने सदर झोपडीची जागा खरेदीच्या पावत्या खोट्या असल्याचे व त्याने त्याच्या झोपडीची चावी न दिल्यास त्याला मारहाण करण्याची धमकी दिली. त्यानंतर दोन तीन दिवसात इब्रान याने आतिकुर याला ग्रीन पार्क येथे भेटण्यासाठी बोलावुन घेतले होते. त्यानुसार गत शनिवारी सायंकाळी अतिकुर हा त्याचे मित्र इक्बाल ताजुन शेख (२३) व शकील सलीम शेख ( २३ ) यांच्यासोबत ग्रीन पार्क येथे इब्रानला भेटण्यासाठी गेला होता. यावेळी आरोपी चंद्रीका राजभर (१९), चंदन राजभर ( २१ ), सुरज व कालिया या चौघांनी त्यांना लाकडी बांबुने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी चंद्रिका व चंदन व त्यांचे वडील दिनेश राजभर यांनी शकील याच्या पोटामध्ये चाकु खुपसुन त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर इब्रान व त्याच्या साथिदारांनी अतिकुर व इक्बाल या दोघांना वेदम मारहाण केली. त्यामुळे त्यांनी त्याठिकाणावरुन पळ काढला. मात्र त्यांचा मित्र शकील हा त्याच ठिकाणी जखमी अवस्थेत पडला असल्याने आतिकुर याने त्याच्या मित्राच्या मदतीने जखमी शकील याला प्रथम वाशी येथील महापालिकेच्या रुग्णालयात व त्यानंतर सायन येथील रुग्णालयात त्याला पुढील उपचारासाठी दाखल आले. या घटनेनंतर एपीएमसी पोलिसांनी आरोपी इब्रान व त्याच्या पाच साथिदारा विरोधात प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यापैकी पाच हल्लेखोरांना अटक केली आहे. पोलिसांकडून आता फरार असलेला एकाचा शोध सुरु आहे.

# नांदगाव एस.टी.सेवा सुरू करण्यात यावी : ग्रामस्थ व प्रवासीवर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सुरक्षित प्रवासात ग्रामीण भागातून महत्त्वाचा दुवा मानला जात असून गेल्या अनेक महिन्यांपासून कोरोना महामारी मुळे बंद करण्यात आलेली मुरुड आग-ाराची मुरुड-नांदगांव ही ग्रामीण फेरी सुरू करण्यात यावी.अशी मागणी नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील ग्रामस्थ व प्रवासीवर्गाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सुनील गोसावी यांनी केली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून मुरुड-नांदगांव एस टी सेवा बंद असल्याने नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील प्रवासी व ग्रामस्थांना अन्य वाहनांचा आधार घेऊन प्रवास करावा लागत असून त्रास सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुरुड आगार प्रमुख यांनी यात लक्ष पुरवून मुरुड-नांदगांव अशी किमान एक तासाला फेरी सुरू करण्यात येऊन येथील जनतेचा दुवा घ्यावा.अशी भावना सुनील गोसावी यांनी व्यक्त केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रायगड जिल्हा कामगार संघटक पदी सत्यवान भगत

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.श्री राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार उरणमध्ये मराठी माणसाचे आधार असलेले मनसेचे तालुका उपाध्यक्ष सत्यवान पंढरीनाथ भगत यांची नियुक्ती रायगड जिल्हा मराठी कामगार सेनेच्या जिल्हा कामगार संघटक पदी करण्यात आली आहे.

सत्यवान पंढरीनाथ भगत यांचा पिंड समाजसेवेचा असून त्यांनी आपल्या कार्यातून अनेक गोरगरिबांना , कामगारा न्याय मिळवून दिला आहे. मनसेचे ते एकनिष्ठ, कट्टर, प्रामाणिक कार्यकर्ते असून मनसेचा उरण पनवेल व रायगड जिल्ह्यात प्रचार व प्रसार करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची नियुक्ती रायगड जिल्ह्याचा कामगार संघटक पदी केली.

सदर नियुक्तीपत्र कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी नाविक सेनेचे उपाध्यक्ष तथा मराठी कामगार सेनेचे उपाध्यक्ष संदेश ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अविनाश पडवळ, अमोल बो–चरे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते .यावेळी नवनियुक्त रायगड जिल्हा कामगार संघटक सत्यवान भगत यांनी माननीय राज साहेब यांच्या आदेशांचे, विचाराचे प्रामाणिकपणे पालन करून संघटना वाढविण्यासाठी तसेच गोरगरिबांना न्याय देण्यासाठी मी रात्रंदिवस झटेन असे मनोगत व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

आज मराठी कामगारांना खंबीर नेतृत्वाची गरज असून त्याची विश्वासार्हता जपणे सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे. या दृष्टीकोनातून सत्यवान भगत यांची रायगड जिल्हा कामगार संघटक म्हणून केलेल्या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून या नियुक्तीमुळे त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# माथेरान नगरपालिका निवडणुकीत आर्थिक फलिताची मुख्य कार्यकर्त्यांना प्रतिक्षा

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : निवडणुका म्हटल्या की आर्थिक उलाढाल ही आलीच आणि त्यात मुख्यतः काही महत्त्वाचे पद जवळ असले की त्याच पदाच्या बळावर आर्थिक मलिदा लाटण्यासाठी नेहमीच काही निष्णात मंडळी नेहमीच चतुराईने आपले ध्येय साधण्यासाठी अग्रेसर असतात. मागील काही दिवसांपूर्वी काही पक्षामध्ये पक्षप्रवेश जोमाने सुरू होते. काहींनी आगामी निवडणूकीवर लक्ष केंद्रित करत उमेदवारी मिळविण्यासाठी पक्षप्रवेश केले आहेत तर काहींनी आपल्यासोबत सुध्दा मोठया प्रमाणावर लवाजमा असल्याचा आभास दाखवून पक्षप्रवेश केले आहेत. माथेरान हे त्यामानाने खूपच अल्प मतदार संख्या असणारे छोटेसे गाव आहे. संपूर्ण गावाची मिळून जवळपास तीन हजारांच्या आसपास मतदार संख्या त्यातही सतरा वार्डात एकूण चार प्रभाग आहेत. आगामी निवडणूक ही चुरशीची होणार असली तरी सुद्धा यामध्ये पुढील रणनीती लक्षात घेता सत्तांतरासाठी युत्या आघाड्या अपेक्षित आहेतच त्याशिवाय कोणत्याही पक्षाचे पान हलणार नाही यात शंकाच नाही. कारण एकहाती सत्ता स्थापन करणे म्हणजे एकप्रकारे मोठे कडवे आव्हानच असते. येणारी निवडणूक काँग्रेस पक्षाने गेल्या




वर्षीच स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली आहे. परंतु पुढील राजकीय समीकरणे पाहता सध्यातरी काँग्रेस पक्षाला सुध्दा साथ देण्यासाठी भाजप हाच एकमेव पर्याय उपलब्ध असू शकतो तर शिवसेनेला यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोबत आणि काही अल्प मताधिक्य असलेल्या पक्षांना सोबत घेऊन दुसऱ्यांदा सत्तेत जाण्याची शक्यता आहे.


लढत ही खऱ्या अर्थाने दुहेरी होण्याचीच स्पष्टपणे चिन्हे दिसून येत आहेत. काँग्रेस आणि शिवसेनेला अल्प मताधिक्य असणाऱ्या पक्षांना काहीतरी आमिष देऊन आपल्यात सामावून घ्यावे लागणार आहे. परंतु काँग्रेस आणि शिवसेनेत ज्यांनी प्रवेश केले आहेत त्यांची सुध्दा स्वप्ने ही केवळ नगरपालिका सभागृहात जाण्यासाठी असल्याने दोन्ही पक्षांना आयात झालेल्या नवोदितांना सांभाळणे ही सुद्धा एकप्रकारची तारेवरची कसरत ठरणार आहे. अनेकदा काही मंडळी ही आपल्याकडे काहीतरी पद असावे यासाठी प्रयत्नात असतात आणि ते कुठल्याही थराला जाऊन वेळप्रसंगी लोटांगणे घालून प्राप्त करतात. अशांना आ–वरणे ही सुद्धा प्रमुख नेत्यांना कला अवगत असते. निवडणुकीत नवा रुपया देखील खर्च करण्याची क्षमता नसताना सुध्दा नगरसेवक पदांचे स्वप्न पाहणारे महाभाग हे प्रत्येक पक्षात असतात. आणि यांचा निवडणुकीचा संपूर्ण खर्च करून निवडून आणल्यावर सुध्दा वेठीस धरणारे महारथी इथेच पहावयास मिळतात अन याचा साक्षात अनुभव इथल्या राजकीय मंडळींना अनेकदा आलेला आहे. त्यामुळे काहींनी अगोदरच आपले या आगामी निवडणुकीत पंचवार्षिक कौटुंबिक फायदा कसा होईल याचे गणित मांडलेलं असते. यामध्ये कुटुंबातील एका सदस्याला उमेदवारी तर अन्य व्यक्तीला नगरपरिषदेच्या माध्यमातून निविदेची बहुतांश कामे त्याचप्रमाणे अन्य काही महत्त्वाच्या कामात वाटणी ही सगळी बेरीज वजाबाकी पक्षाच्या नेत्यांसमोर मांडून एकप्रकारे वेठीस आणण्याची भूमिका सुध्दा निवडणूक पुर्वकाळात बजावली जाते. तर कुणी आपल्याच नातेवाईकाला स्वीकृत सदस्य कसे मिळेल या प्रयत्नात असतो. इथली अशीही काही कुटुंबे आहेत की ज्यांनी सगळे पक्ष घरात वाटून घेतले आहेत. त्यामुळे जरी कोणत्याही पक्षाची सत्ता स्थापन झाली तरी फायदे यांच्याच घरात मिळत असतात आणि यापुढेही अशाच प्रकारे कार्यकर्त्यांचा फार्म्युला असणार यात शंका नाही. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी सुध्दा राजकीय क्षेत्रांत आपल्याला सुध्दा कशाप्रकारे लाभ होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे अन्यथा निवडणुकीत केवळ झेंडा पेलण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

# धाटावमधे साखर चौथच्या गणरायाचे जल्लोषात आगमन

**दै.रायगड नगरी । धाटाव**

भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी नंतर आज संकष्टी चतुर्थीच्या दिवशी आगमन झालेल्या साखर चौथीच्या गणरायाचे धाटावमधे मोठ्या जल्लोषात आगमन झाले. थाटामाटात आगमन झालेल्या देवबाप्पाचे मखरात विराजमान झाल्यानंतर भक्तिमय वातावरणात विधिवत पूजा,महाआरती करण्यात आली.

साखर चौथ हे एक व्रत असल्याने चतुर्थी पुजली जाते. यानिमित्ताने आज धाटावचा राजा मित्र मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही धाटावच्या राजाचे आज आगमन झाले. गावामध्ये पांडुरंग माने, पांडुरंग जाधव तर विष्णूनगरमधे ग्रामस्थ व महिला मंडळाच्या वतीने व बारसोली येथे बापुजिदेव मित्र मंडळाच्या




वतीने यावर्षी साखरचौथच्या गणरायाची प्रतिष्ठपना करण्यात आली होती. यासर्वच ठिकाणी मोठ्या भक्तिभावाने गणरायाची विधिवत पूजा करण्यात आली. कोरोनाच्या संक्रमण काळात महाराष्ट्रात रक्ताचा पुरवठा कमी असल्याने आरोग्य विभागाच्या वतीने रक्तदान करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत गावातील तरुण वर्गाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. दरम्यान ३५ रक्तदात्यांनी याठिकाणी रक्तदान केले. तर रक्तदात्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

रायगड जिल्हा शासकीय रक्तपेढी अलिबाग येथील डॉ.गोसावी यांनी मार्गदर्शन केले. याकामी आदेश भोकटे, राहुल रटाटे यांच्यासह तरुण मित्रांनी विशेष मेहनत घेतली. या लोकोपयोगी उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले. एकंदरीत साखर चौथीच्या गणरायाचे आज आगमन झाल्याने या परिसरातील वातातवण भक्तिमय झाल्याचे पहावयास मिळाले.



**साखर चौथ निमित्त परदेशी आळी येथील नवनाथ मित्र मंडळाने स्थानापन्न केलेले गणराज**



**साखर चौथ निमित्त मिरची गल्ली येथील चैतन्य उमाकांत शेट्ये यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज**

## पोलिस शिपायावर बलात्काराचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बलात्काराचा गुन्हा दाखल असल्याने एका पोलीस शिपायावर निलंबनाची कारवाई नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी केली आहे. रुपेश कोळी असे आरोपी पोलीस शिपायाचे नाव आहे.

पोलीस शिपाई रुपेश सुरेश कोळी (वय २३) याने पीडित महिलेची इन्सटग्रामवर ओळख वाढवली व त्यांच्याशी मैत्री करून लग्न करणार आहे असे सांगून तिच्यासोबत वारंवार शारिरीक संबंध ठेवले. आणि ती पीडित महिला गरोदर राहिल्यावर गर्भनिरोधक गोळ्या देऊन त्यांचा गर्भपात केला आणि पीडित महिलेसोबत लग्न करण्यास नकार दिला.

चार दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई रुपेश यांच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर गुन्ह्याची प्राथमिक माहिती स्वतः आयुक्तांनी घेऊन त्याबाबत खातरजमा करून ही सक्तीची कार्यवाही केली आहे. रुपेश हे नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील परिवहन विभागात नेमणुकीस होते. त्यांच्याकडील ओळखपत्र, सरकारी शस्त्रही तातडीने जमा करण्यासह त्यांना दररोज रोडपाली, कलंबोली येथील पोलीस मुख्यालयात हजेरी लावण्याचे आदेश आहेत.

## आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका आरोपीस स्थानिक नागरिकांच्या मदतीने पनवेल शहर पोलिसांनी गज–ाआड केले आहे. तालुक्यातील भंगारपाडा येथील विघ्नहर्ता निवासमध्ये असलेल्या बाथरुमच्या खिडकीतून आज घुसून घरफोडी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या विनायक मुंढे (२९ रा.सोमटणे) या इसमास स्थानिक नागरिकांनी रंगेहाथ पकडले असून त्याच्याकडून घरफोडीत लागणारे साहित्य हस्तगत केले आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्रीमती.बारकूबाई शनवार मढवी वगैरे १५ यांचे नावे त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०–१३–० हे.आर. इतके क्षेत्र महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्रीमती.बारकूबाई शनवार मढवी वगैरे १५ यांचे हिश्श्याचे | ५६/४ | ०–२६–९० यापैकी ०–१३–०० | २–९७ |

मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्रीमती.बारकूबाई शनवार मढवी वगैरे १५ यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०–१३–० हे.आर. इतके क्षेत्र आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ९ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२४/०९/२०२१**

**सही/–**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट–हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

अर्जदारांतर्फे वकील : श्री.निखिल भोईर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/११/२०२१

१) श्रीमती.मोतोबाई मंगळ पाटील, वय वर्षे : ७५
२) श्री.प्रदीप मंगळ पाटील, वय वर्षे : ४९
३) श्री.संदीप मंगळ पाटील, वय वर्षे : ४३
वरील अ.नं.१ ते ३ रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.जयश्री भुषण म्हात्रे, वय वर्षे : ५२
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.अलका रवींद्र तांडेल, वय वर्षे : ४५
रा.करळ, हनुमान मंदिजवळ, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.मंगळ महादेव पाटील हे दि.१४/१०/२०१७ रोजी मौजे : बोकडविरा, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मालकीची मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत अर्जदार हेच कै.श्री.मंगळ महादेव पाटील यांचे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत असे ठरविण्याकरिता अर्जदारांनी कै.मंगळ महादेव पाटील यांचा वारस दाखला मिळणेसाठी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकती**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नंबर |
|---|---|---|---|---|
| बोकडविरा | १५ | ३ | ०–१४–८ | १५८/८७ |
| | १८ | ३ | ०–०५–८ | १५८/८७ |
| | १९ | ३ | ०–०३–३ | १५८/८७ |
| | ४२ | १ अ | ०–०७–३ | १५८/८७ |
| | ४३ | ६ ब | ०–०७–६ | १५८/८७ |
| | ६८ | १ | ०–२५–९ | १५८/८७ |
| | ७१ | २ | ०–३१–० | १५८/८७ |
| | ७१ | ४ | ०–२८–८ | १५८/८७ |
| | ९० | ४ | ०–२२–० | १५८/८७ |
| | १३८ | ५ | ०–१६–४ | १५८/८७ |
| | १२१ | ७ | ०–०५–१ | १५८/८७ |
| | १२१ | १० | ०–११–३ | १५८/८७ |
| | १४५ | २ | ०–१३–६ | १५८/८७ |
| | १२६ | २६ | ०–०२–५ | १५८/८७ |
| | १६० | ४ | ०–१४–९ | १५८/८७ |
| | १५४ | ४ | ०–०१–५ | १५८/८७ |
| | १२७ | ११ | ०–०८–४ | ४३/८५ |
| | १७५ | २ | ०–३०–० | ६४/८६ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात भूखंड प्रदान केले जाणार आहेत. श्रीमती.मोतोबाई मंगळ पाटील वगैरे ४ हेच कै.श्री.मंगळ महादेव पाटील यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस कोणत्याही प्रकारच्या हरकती घ्यावयाच्या असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्याया, उरण** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, उरण**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.अशोक कान्हा पाटील व दिपक कान्हा पाटील यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.अशोक कान्हा पाटील दिपक कान्हा पाटील | ३५/२ | ०–४२–३० | ७–०६ |

मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.अशोक कान्हा पाटील व दिपक कान्हा पाटील यांची वरील नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ९ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२४/०९/२०२१**

**सही/–**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट–हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

अर्जदाराचे वकील ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/११/२०२१

श्री.परशुराम सिताराम भोईर
वय : ६१ वर्षे, व्यवसाय :
वरील रा.घर नं.९१२, कोटनाका, राघोबा मंदिरा जवळ,
ता.उरण, जि.रायगड–४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सिताराम भिकाजी भोईर यांचे निधन रा.मु.पो.काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.सिताराम भिकाजी भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.सिताराम भिकाजी भोईर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : काळाधोंडा ४७ | ५ | ३ | ०–१–३ |
| २ | | ६ | २ | ०–२७–० |
| ३ | | ८ अ | २ | ०–२–८ |
| ४ | | ११ | ३ | ०–१०–० |
| ५ | | ११ | ५ | ०–१२–७ |
| ६ | | ७९ | ३ | ०–०१–८ |
| ७ | | ७९ | ६ | ०–१४–८ |
| ८ | | ८१ | ३ | ०–०३–५ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार हे कै.सिताराम भिकाजी भोईर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२४/०९/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

श्री.भाकरे सो.कोर्ट
अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२६७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

श्री.अरुण जनार्दन दुंदरेकर
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
रा.केशव चाळ, विचुंबे गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.नथु गावंड यांची मयत मुलगी कै.मथुराबाई उर्फ मथीबाई जनार्दन दुंदरेकर, रा.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड ह्या दि.१९/०३/२०२१ रोजी मौजे : विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांना श्री.अरुण जनार्दन दुंदरेकर, रा.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड हे वारस आहेत. सदर अर्जदार यांनी कै.मथुराबाई उर्फ मथीबाई जनार्दन दुंदरेकर यांचा हिस्सा असलेल्या खालील मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वडघर | १०३ | १३२ | ५ अ | ०–११–२ | २.४६ |
| वडघर | ६७ | १२१ | ७ | ०–०९–६ | १.८१ |
| वडघर | ११४ | ४८ | ४ | ०–०३–० | ०.५८ |
| | | ११८ | ३ | ०–२२–८ | ४.४४ |
| | | १२३ | १ | ०–१०–६ | १.९४ |
| | | १२४ | १ | ०–७७–४ | १६.१३ |
| | | १२२ | २ | ०–२४–८ | ४.६९ |
| | | १२५ | ४ | ०–५८–४ | १३.१९ |
| वडघर | ७ | १३२ | ५ ब | ०–०८–३ | १.४० |
| वडघर | ७७ | १२२ | ५ क | ०–०८–६ | १.६० |

वरील अर्जदार हे कै.मथुराबाई उर्फ मथीबाई जनार्दन दुंदरेकर यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.मथुराबाई उर्फ मथीबाई जनार्दन दुंदरेकर यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२४/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# सामाजिक बांधिलकी जपणारा गडब येथील मंगलमुर्तींचा गणेशोत्सव

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

सर्व सभासदाची एकजुट ग्रामस्थाची व महिलांची मिळत असलेली साथ सभासदाचा ऐकमेकावर असलेला विश्वास श्री गणेशावरील अतुट भक्ती व सामाजिक बांधिलकी जपणारा पेण तालुक्यातील गडब-जांभेळा येथील मरुदेवी मंदिराचे प्रांगणात मंगलमुर्ती मित्रमंडळ गडब या मंडळाचे विद्यमाने सतत नऊ वर्षे साखरचौथ गणेश उत्सव साजरा करत आहेत या पुढेही हा उत्सव मोठ्या साजरा करणार असल्याचा विश्वास मंडळाचे सदस्य व्यक्त करीत आहेत.

आजुबाजुच्या गावात साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असताना आपल्या गावात देखिल हा उत्सव



साजरा व्हावा या साठी येथिल तरुणांनी एकत्र येवुन येथे गणेशोत्सव साजरा करण्याची संकल्पना आखली. त्याला ग्रामस्थांनी साथ दिली हा उत्सव साजरा करण्यापाठीमागे हेतु भावनिक तर होताच परंतु गावातील कलाकारांना व्यासपिठ निर्माण करुन देण्याचा उद्देश समोर ठेवुन हा उत्सव साजरा करण्याची संकल्पना आहे. येथिल सजावट व गणपतीची आरास गावातील तरुण कलाकार करतात. अगदी अंगणवाडीत शिक्षण घेणाऱ्यांपासुन ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार या ठिकाणी करण्यात येत आसुन त्यांना प्रोत्साहीत करण्याचे काम मंडळातर्फे करण्यात येत आहे या सर्व कार्यक्रमासाठी समाजातील मान्यवरांचे सहकार्य मिळते या उत्सवाचे पुर्ण नियोजन व कार्यक्रमाची आखणी सर्व तरुण मंडळी करीत असुन जेष्ठ मंडळी मार्गदर्शकांची भुमिका बजावत असल्याने तरुणांना नेतृत्व करण्याची संधी या ठिकाणी मिळत आहे. तर या वर्षी मंडळाचे नववे वर्ष असल्याने व कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता ईतर कार्यक्रम रद्द केले असुन या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मंडळातील तरुण गायक शिवम पाटील व भावनेश पाटील ईच्छापुर्ती मंगलमुर्ती हे गाणे युट्युब टाकले असुन त्यांना भरपुर प्रमाणात प्रोत्साहन मिळत आहे, त्याच प्रमाणे गावात होणाऱ्या ईतर कार्यक्रमाचे वेळी या मंडळामार्फत विविध स्पर्धाचे व उपक्रमाचे आयोजन या मंडळामार्फत करण्यात येत असल्याने सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम मंगलमुर्ती मित्रमंडळ गडब- जांभेळा यांच्या मार्फत करण्यात येत आहे या मंडळाचे अध्यक्ष मनिष पाटील, उपाध्यक्ष रोशन पाटील, खजिनदार वंसत पाटील आदिचे कार्यकारी मंडळ कार्यरत आहे.

# संक्षिप्त...

## म्हसळा नगर पंचायत कर्मचारी संतोष कुडेकर यांनी प्राप्त केली कला शाखेची पदवी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायत समितीचे गुणवान कर्मचारी तथा म्हसळा तालुका कुंभार समाजाचे समाजसेवक संतोष कुडेकर यांनी जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करून सेवा काळात वयाच्या ५५ व्या वर्षी कळा शाखेची पदवी प्राप्त करून यश मिळविले आहे.सामाजिक सेवेच्या सर्वच क्षेत्रात आणि कार्यक्रमात सहभागी होऊन कार्य तडीस नेण्याची कार्यपद्धती असलेल्या संतोष कुडेकर यांनी जिद्दीने पदवी मिळवत भावी पिढीला पद आणि पदवी मिळवण्यासाठी वयाची अट लागत नाही हे सिद्ध करून दाखवले आहे.यश मिळविण्यासाठी हवी असते ती फक्त जिद्द आणि प्रचंड ईच्छाशक्ती असे आनंदी मनोगत कुडेकर यांनी व्यक्त केले आहे.त्यांनी मिळविलेल्या यशाचे संत गोरोबा काका कुंभार समाज तालुका म्हसळा ग्रामस्थ व महिला मंडळ,नगर पंचायत प्रशासन तसेच कुंभार समाज युवा नेते जितेंद्र पाभरेकर यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## नथुराम भोईर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । वाकण**

पाली जवळील आपटवणे (ता.सुधागड) येथील रहिवासी व ज्येष्ठ नागरिक नथुराम बाबू भोईर (वय ९०) यांचे बुधवार दि. २२ जुलै, २०२१ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आपटवणे येथीलच त्यांच्या राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आपटवणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. नथुराम भोईर यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुलगे हरिश्चंद्र, संतोष व रामचंद्र, तीन विवाहित मुली अल्का अनंत साजेकर, संगिता मधुकर जांभुळकर, शकुन झांजू पवार, सुना, जावई, नातंवडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत नथुराम भोईर यांचा स्वभाव अतिशय प्रेमळ व मनमिळाऊ होता. आपल्यापेक्षा वयाने लहान-मोठ्या असलेल्या सर्वच व्यक्तींचा ते आदर करीत असत. आपटवणे गावातील विविध सामाजिक व धार्मिक कार्यात ते नेहमीच हिरीरीने भाग घेत असत.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# नगराध्यक्षांनी घेतली एमएमआरडीए अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

अन्य पर्यटनस्थळाच्या तुलनेत माथेरान हे सुंदर गाव अनेक वर्षांपासून विकासापासून खूपच पिछाडीवर होते. परंतु २०१३ साली एमएमआरडीए ने माथेरान मधील प्रलंबित असणाऱ्या विकास कामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिल्यामुळेच मागील दोन वर्षांपासून इथे युद्धपा-तळीवर कामे सुरू आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने माथेरानची एकप्रकारे नवीन ओळख निर्माण होत आहे.



याकामी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत यांनी आपल्या शिष्टमंडळासह मुंबई येथील एमएमआरडीए कार्यालयात जाऊन संबंधीत अधिकारी वर्गाची सदिच्छा भेट घेऊन त्यांनी माथेरान प्रती जी काही विकास कामे मार्गी लावण्यासाठी सकारात्मकता दाखविलेली आहे आणि त्यांचे वेळोवेळी उत्तम प्रकारे मार्गदर्शन लाभल्यामुळे कामे प्रगतीपथावर पूर्णत्वास गेली आहेत.यावेळी एमएमआरडीए चे आयुक्त श्रीनिवास, अतिरिक्त आयुक्त डॉ. गोविंद राज, कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

एमएमआरडीए च्या या सर्व संबंधित अधिकारी वर्गाच्या दांडग्या अनुभवातुन आणि सकारात्मक प्रतिसाद देत उत्तम प्रकारे मार्गदर्शन केल्यामुळे दस्तुरी नाक्यावर सुसज्ज वाहन पार्किंग सुविधा त्याचप्रमाणे हार्ट पॉईंट आणि मायरा पॉईंटला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. यापुढेही एमएमआरडीए च्या माध्यमातून या गावाला भरीव निधी उपलब्ध करुन या गावाचा सर्वतोपरी कायापालट करावा जेणेकरून इथे पर्यटकांची संख्या अधिकाधिक वाढून सर्वसामान्य लोकांच्या उत्पन्नात वाढ होईल असे प्रसाद सावंत यांनी स्पष्ट केले.

# सुधागडात साखर चौथ गणपतीच्या सोहळ्याची धामधूम

## सर्वत्र उत्साह व भक्तिमय वातावरण



**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : पाली सुधागड सह जिल्ह्यात साखर चौथ गणपती उत्सव अत्यंत धार्मिक व मंगलमय वातावरणात साजरा होतोय, साखर चौथ गणपती स्थापनेला आ-गळेवेगळे महत्व आहे, अनंत चतुर्दशीनंतर चार दिवसांनी साखर चतुर्थीला गणरायाचे आगमन होते.पालीत अष्टविनायक देवस्थानापैकी प्रसिद्ध धार्मिक स्थळ असल्याने गणरायाचा महिमा व श्रद्धाभाव अधिक दिसून येतो.

संकष्ट चतुर्थी दिवशी पाली, सुधागड व जिल्ह्यातील अनेक गावे वाड्या वस्त्यात यंदा देखील साखरचौथ गणेशोत्सव सुरू झालाय. जिल्ह्यात ७३१ मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आलीय. या सणात विविधांगी धार्मिक, सामाजिक, लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. २४ सप्टेंबरला सजवलेल्या मखरात गणराय थाटलेत, रायगड जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात हा सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

गणेशोत्सव मंडळे गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करतात. ढोल-ताशांच्या गजरात 'श्रीं'च्या मूर्ती आणल्या जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हाध्यक्षा गीताताई पालरेचा यांच्या निवासस्थानी साखर चौथ गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती, विविध सामाजिक व राजकीय मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी नागरिक आदींनी गणरायाचे दर्शन घेतले.

सुधागड तालुक्यातील आदिवासी वाड्या वस्त्यात देखील नेहमीप्रमाणे यंदाही साखरचौथ गणपती उत्सव साजरा होतोय. कोरोना काळात ही नागरिकांचा उत्साह व जोश कायम दिसतोय.

# खांब परिसरात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

खांब परिसरात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा विविध धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला आहे. अनंत चतुर्थीला दहा दिवसांचे विसर्जन केल्यानंतर आज साखरचौथ गणेशोत्सव अंतर्गत खांब परिसरात घरगुती तसेच सार्वजनिक स्वरुपात या दिवसाला मोठ्या भक्तीभावाने गणरायांचे आगमण करून उत्सव साजरा करण्याची परंपरा लाभली आहे.

आज साखरचौथ गणरायाचे वाजतगाजत आगमन झाल्यावर मोठ्या भक्तिभावाने पुजन व महाआरती करण्यात आली. तसेच या दिड दिवसाचे उत्सवात हरिपाठ,जागर भजन व अन्य धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात येत आहेत. खांब विभागातील विविध गावामध्ये सार्वजनिक व घरगुती स्वरूपात हा दीड दिवसांचा उत्सव साजरा केला जात आहे. सध्या कोरोना व्हाईरसमुळे सर्वच सण व उत्सव साजरे करण्यासाठी शासकीय नियमानुसार साजरे करावे लागत आहेत.नुकतेच दहा दिवसांचा गणेशोत्सवही शासकीय नियमानुसार साजरा करण्यात आला. त्याच धर्तीवर साखरचौथ गणेशोत्सव देखील शासकीय नियमानुसार व सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून साजरा केला जात आहे.

# मेडिकलमध्ये नॉन-फार्मासिस्टकडून होत आहे औषध विक्री ; कारवाईची गरज

**दै.रायगड नगरी । पनवेल**

औषधांच्या दुकानामध्ये परवानाधारक फार्मासिस्ट असणे बंधनकारक असले, तरीही पनवेल परिसरातील मेडिकलमध्ये नॉन-फार्मासिस्टकडून औषध विक्री होताना दिसत आहे. या प्रकारामुळे रुग्णांच्या जीवाला धोका उद्भवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे अशा प्रकारे औषध विक्री करनारयावर कारवाईची मागणी केली जात आहे.

पनवेल तालुक्यात काही गावात आजही आरोग्य सुविधांचा अभाव आहे. नागरिकांना उपचाराकरिता जवळच्या गावात जावे लागते. मेडिकलची संख्या मोठी आहे, मात्र ही औषधे दुकाने वेगळ्याच प्रकारे चाललेले दिसतात. स्वतःच्या मालकीचे औषध विक्रीचे दुकान सुरू करण्यासाठी डी फार्मसी अथवा बी फार्मसी पदवी झालेला आपला परवाना पंधरा ते वीस हजार रुपये महिना भाड्याने देत आहेत. फार्मासिस्ट असणाऱ्या व्यक्तीनेच औषधविक्री करावी असा नियम असला तरीही आज मात्र डॉक्टरांनी लिहिलेलं इंग्रजी वाचू शकणारा कुणीही हे काम करत असल्याचे समोर आले आहे. फार्मासिस्ट या शब्दाला औषधविक्रेता हा समानार्थी शब्द तयार होण्याला स्वत: फार्मासिस्ट जबाबदार आहेत. औषध दुकानदार असणारे फार्मासिस्ट रूग्णांना सल्ले देत नाहीत. फार्मसीचे पदवीधर असतानाही प्रत्यक्षात मात्र नॉन-फार्मासिस्ट औषधांची विक्री करताना दिसून



येत आहेत. औषधांची माहिती तसेच ज्ञान नसलेल्या अप्रशिक्षित व्यक्तीने जर चुकीची औषधे दिली, तर त्यामुळे एखाद्याच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. औषधविक्रेत्यांचे काम हे केवळ डॉक्टरांनी दिलेली औषधे रुग्णांना देणे एवढेच नसून औषधे कशी घ्यावीत, कोणत्या अन्नपदार्थांसोबत कोणती औषधे टाळावीत, हे फार्मासिस्टनी सांगणेही गरजेचे असते. अप्रशिक्षित व्यक्तीकडून चुकीची माहिती दिली जाण्याची शक्यता असते. मात्र तरीही अनेक औषधविक्रेते छुप्या मार्गाने हे प्रकार करतात, असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे एफडीएकडून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

फार्मासिस्टच्या अनुपस्थितीत अप्रशिक्षित व्यक्तींकडून बरयाचदा औषध वितरण केले जाते. परिणामतः रुग्णांच्या आरोग्यास बाधा झाल्याच्या घटना सतत घडत असतात. औषधांचा चुकीच्या पद्धतीने वापर करणे किंवा चुकीची औषधे घेणे यामुळेही व्यक्ती दगावण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. रुग्णांना डॉक्टरने लिहून दिलेली औषधाची चिठ्ठी व त्यावरील औषधांची विक्री फार्मासिस्टच्या देखरेखीखाली झाली पाहिजे असा नियम आहे. मात्र सर्व नियमांना पायदळी तुडवत फार्मासिस्ट त्यांचा औषध विक्रीचा परवाना भाड्याने घेऊन विना फार्मचे औषध दुकान चालवण्याचा धंदा पनवेल तालुक्यात सुरू आहे, याकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे रुग्णांवर विपरीत परिणाम होत असल्याच्या घटना घडल्या असल्याचे समोर आले आहे.

याबाबतीत प्रतिबंधात्मक पावले उचलणे आवश्यक आहे. असे झाले नाही तर जीवनदान देणारी औषधेच टॉप टेन किलर्सच्या यादीत जाऊन बसतील अशी भीती जाणकार व्यक्त करतात.

# ४ वर्षीय मुलाला रेल्वे स्थानकाच्या फलाटावर आपटून हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्नीशी झालेल्या वादातून एका व्यक्तीने आपल्या चार वर्षीय मुलाला सानपाडा रेल्वे स्टेशनवरील फलाटावर दोन वेळा आपटल्याने सदर मुलाचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना उघडकिस आली आहे. सकलसिंग हरिदास पवार (२३) असे या व्यक्तीचे नाव असून वाशी रेल्वे पोलिसांनी त्याला हत्येच्या गुह्याखाली अटक केली आहे. सोमवारी सकाळी ही घटना घडली असून सदर घटना सानपाडा रेल्वे स्टेशनवर असलेल्या सीसीटीव्ही कॉमेऱ्यात कैद झाली आहे.

या घटनेतील आरोपी सकलसिंग हा सानपाडा हायवे ब्रिज खाली राहाण्यास असून तो व त्याचे कुटुंबीय व नातेवाईक मिळेल ते काम करुन तसेच भिक मागून आपला उदरनिर्वाह करतात. सकलसिंगला दोन पत्नी असून पहिल्या पत्नीपासून त्याला चार वर्षाचा मुलगा प्रशांत आहे. सकलसिंगची पहिली पत्नी मुळ गावी असून सध्या तो दुसरी पत्नी मेहेर पवार व मुलगा प्रशांत यांच्यासह सानपाडा हायवे ब्रिजखाली राहत होता. गत रविवारी रात्री सकलसिंग याचे पत्नी मेहेर पवार हिच्यासोबत पैशाच्या कारणावरुन भांडण झाले होते.

या भांडणात त्याने त्याचा मुलगा प्रशांत याला मारहाण केल्याने तो जखमी झाला होता. त्यामुळे मेहेर पवार हिने पती सकलसिंग विरोधात सानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे सानपाडा पोलिसांनी सकलसिंग याला रात्रभर पोलीस ठाण्यात बसवून ठेवून सकाळी त्याला सोडून दिले होते.

त्यानंतर सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सकलसिंग याचे पुन्हा पत्नी मेहेर पवार हिच्यासोबत वाद झाले. त्यामुळे सकलसिंग याने पत्नी सोबत झालेल्या भांडणाचा रागातून सानपाडा रेल्वे स्टेशन वरील फलाट नं. ३-४ वर पत्नी मेहेर व काही नातेवाईकांसमोर आपला मुलगा प्रशांत याला दोन वेळा फलाटावर जोरदार आपटले. त्यामुळे प्रशांत गंभीर जखमी होऊन गतप्राण झाल्यानंतर सकलसिंग याने त्याला त्याच अवस्थेत सानपाडा हायवे ब्रिजखाली असलेल्या आपल्या भावाकडे दिले. सानपाडा पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी सानपाडा हायवे ब्रिजखाली धाव घेऊन जखमी प्रशांतला रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. या घटनेनंतर सानपाडा पोलिसांनी रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासनी केली असता, त्यात सकलसिंग हा आपल्या मुलाला सर्वांसमोर फलाटावर आपटत असल्याचे निदर्शनास आले.


सकलसिंग यानेच आपल्या मुलाला फलाटावर आपटल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तसेच सदरची घटना सानपाडा रेल्वे स्टेशनवर घडल्याचे आढळून आल्यानंतर सानपाडा पोलिसांनी सकलसिंग याला वाशी रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानुसार सकलसिंग याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आल्याची माहिती वाशी रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू केसरकर यांनी दिली आहे.

# अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलातून खेळाडूंना व नागरिकांना लवकरच मिळणार क्रीडाविषयक सोयी-सुविधा

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग जिल्हा क्रीडा संकुल हे जिल्ह्यातील खेळाडू आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्वाची वास्तू असून येथून लवकरच सर्वांना क्रीडाविषयक सोयीसुविधा मिळतील,या दृष्टीने काम सुरू करण्यात येत आहे,असे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले.



जिल्हा क्रीडा संकुल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन आढावा बैठक संपन्न झाली,त्यावेळी त्या बोलत होत्या.

या ऑनलाईन बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, विभागीय क्रीडा उपसंचालक संजय महाडिक, कार्यकारी अभियंता श्री.सुखदेवे, जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, क्रीडा अधिकारी श्री.सचिन निकम, नगरपालिका मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी उपस्थित होते.

संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताना पालकमंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, या क्रीडा संकुलात खेळाडूंना तसेच नागरिकांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे,ही आपली जबाबदारी आहे. यासाठी आवश्यक कार्यवाही तात्काळ सुरू करावी. लवकरच याबाबत सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेवटी जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांनी सर्वांचे आभार मानले.